# Positive Story of Nagpur Rural Police

दिनांक ३०/०५/२०२५

## अल्पवयीन बालिकेसोबत लैगिंक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. बुट्टीबोरी :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३२७/२३ कलम ३७६(अ,ब),३७६(३),४५२,५०६ भादवी सहक. ४,६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

नमुद गुन्हयातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही तिच्या घरात एकटी असल्याचे पाहुन यातील आरोपी नामे **सचिन नामदेव कुकडे, वय ३९ वर्षे ,रा. टिचर कॉलनी हिंगणघाट ह.मु. रा. बोरखेडी फाटा , बुटीबोरी** याने फिर्यादीच्या घरात जावुन जबरदस्तीने अल्पवयीन पिडीतेवर लैगिंक अत्याचार केला तसेच सदर घटनेबाबत कुणालाही सांगीतले तर पिडीतेला मारण्याची धमकी दिली, अशा फिर्यादिच्या रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद आहे.

सदर प्रकरणाचे सखोल तपास करून उपविभागिय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांनी आरोपीविरूध्द दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश क्र ६ श्रीमती एच.सी. शेंडे यांनी दिनांक ३१/०५/२०२५ रोजी आरोपी नामे सचिन नामदेव कुकडे, वय ३९ वर्षे ,रा. टिचर कॉलनी हिंगणघाट ह.मु. रा. बोरखेडी फाटा , बोरी याला १) **कलम ३७६(अ,ब), ५११ भादवी मध्ये १२ वर्षे सश्रम कारावास व १०,०००/—रूपये दंड ,दंड न भरल्यास ०६ महिने साधा कारावास २) कलम ४५२ भादवी मध्ये ७ वर्षे सश्रम कारावास व ५०००/— रूपये दंड ,दंड न भरल्यास ३ महीने साधा कारावास ३) कलम ३७६ (३), ५११ भादवी सहक. ४,६,१८ पोक्सो मध्ये १२ वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रू. दंड ,दंड न भरल्यास ०६ महिने साधा कारावास, अशी शिक्षा ठोठावण्यात आलेली आहे.**

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती दिपीका गवळी यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सफौ अनिल व्यवहारे पो.स्टे.बुट्टीबोरी यांनी मदत केली आहे.